

नीरजा
साहित्यिका

## दृष्टीआडची सृष्टी

# आकांताला छेद देत जगताना



**कवी किंवा लेखक बाहेरच्या जगात वावरताना केवळ कवी नसतो तो अनेकांसारखाच एक असतो. एकाच वेळी अनेक भूमिका वठवत असतो. फक्त त्याचं मन काहीतरी सतत टिपत असतं, शोधत असतं. हा शोध घेताना मला अगदी सुरुवातीपासून जाणवली ती जगण्यातली निरर्थकता, आपलं हजारो तुकड्यांत झालेलं विभाजन, आपलं बदललेलं राजकीय वास्तव आणि गुंतागुंतीचे होत गेलेले सामाजिक संदर्भ. हे सगळं अस्वस्थ करतं मला. मग ही अस्वस्थता अचानक शब्दांतून उतरते, त्याची कथा होते तर कधी कविता. 'निरर्थकाचे पक्षी' किंवा 'मी माझ्या थारोळ्यात' असे कवितासंग्रह असोत की 'पावसात सूर्य शोधणारी माणसं' किंवा 'अस्वस्थ मी अशांत मी' हे कथासंग्रह असोत माझ्या आत चालू असलेली उलथापालथ माझ्या संग्रहांच्या नावातूनही व्यक्त होत राहाते...**

हजारो शब्द त्याच्या अर्थांसकट कवी किंवा लेखकाच्या मनात एखाद्या चक्रीवादळासारखे फिरत असतात. त्यांच्या गुंत्यात तो कायमचा अडकलेला असतो. हा गुंता सोडवत सोडवत नेमक्या शब्दापर्यंत पोचणं ही दमवणारी गोष्ट असते त्याच्यासाठी. या साऱ्यातून वाचकांपर्यंत जे पोचतं ते हिमनगाच्या छोट्याशा टोकाएवढंच असतं. जे वाटतं ते नेमकं शब्दात पकडणं खरंच कठीण असतं कवीसाठी. म्हणूनच मग तो पुन्हा पुन्हा लिहीत राहतो. कधी कधी तेच ते, पण वेगळ्या शब्दात, वेगळ्या प्रतिमांचा वापर करून. पुनः पुन्हा सांगत राहतो कवी अथवा लेखक विविध भावभावनांविषयी, कधी मिळालेल्या वा न मिळालेल्या प्रेमाविषयी तर कधी वर्ग, जात, धर्म आणि लिंगभेदामुळं वाट्याला आलेल्या वेदनेविषयी.

कोणताही कवी अथवा लेखक एखादी कविता किंवा कथा लिहून थांबत नाही. त्या कवितेत जे सांगितलं असतं त्यानं त्यापेक्षा जास्त काहीतरी मनात उरलेलं असतं त्याच्या! ज्या जगात तो राहात असतो त्या जगात घडणारी प्रत्येक गोष्ट त्याच्यावर येऊन आदळत असते. हे सारंच आतल्या आत भणभणत राहातं वादळासारखं. मनाला छेदत जाणारा त्या वादळाचा तो आवाज अस्वस्थ करत असतो त्याला. त्या अस्वस्थतेतून बाहेर पडण्यासाठी तो शोधत राहतो नेमका शब्द. कधी तो सापडतो तर कधी सापडल्यासारखा वाटतो. कागदावर उतरवतो तो ते सारंच. मग पुन्हा एकदा नवं काही. तरी आत खोल काहीतरी उरतंच जे सारखं वर येत राहातं मनाचा तळ ढवळून.

ही प्रक्रिया चालू राहाते सतत त्याच्या मनात. त्यामुळेच 'ब्राह्मण नाही हिंदूही नाही' किंवा 'नरेची केला हीन किती नर' म्हणत केशवसुत पुनः पुन्हा सांगत राहातात 'नव्या मनूची गोष्ट'. विजय तेंडुलकरांना 'सखराम बाईंडर' अपुरा पडतो हिंसेविषयी सांगताना. माणसातलं हे जनावर मग त्यांच्या 'कन्यादान' या नाटकामध्ये डोकावतं. कधी 'घाशीराम कोतवाल' तर कधी 'कमला'सारख्या नाटकांमधून बाहेर पडत राहातं. नामदेव ढसाळांना 'गोलपीठा'मधून जे सांगायचं होतं ते संपलेलं नसतं म्हणूनच 'निर्वाणा आगोदरची पीडा'पर्यंत येऊन पोचतात ते. तरी दशांगुळे काहीतरी उरतंच. कारण कवीच्या मनात सतत चालू असतो एक संघर्ष. कधी त्याचा त्याच्या बाह्य जगाशी, तर कधी स्वतःचा स्वतःशीच. आतल्या आत झुंजत असतो तो. स्वतःला तपासून पाहात असतो आणि स्वतःला शोधत असतो. हा शोध अखंड चालू असतो. हा सगळा काळ हा आत्मशोधाचा काळ असतो. या प्रक्रियेमध्ये तोही घडत असतो. लेखकाच्या घडण्याची ही प्रक्रिया थांबली की मात्र तो संपून जातो.

मला स्वतःला हा स्वतःचा शोध फार महत्त्वाचा वाटतो. जगण्यातल्या अनेक विसंगतींना तोंड देत स्वतःला शोधू पाहताना खऱ्या अर्थानं संघर्ष सुरू होत असतो आपला आपल्याशी. एक संवेदनशील आणि सर्जनशील लेखक म्हणून या संघर्षाला मीही सतत तोंड देत असतेच.

'निरन्वय' या संग्रहातील 'प्रतीक्षा' नावाच्या माझ्या पहिल्याच कवितेत मी म्हटलंय,

*एक दिवस संध्याकाळी*
*काळोखभरल्या पानांनी कातर होऊन*
*ती बाहेर पडली.*
*तेव्हापासून तिचे डोळे काजवे झाले*

वीसएक वर्षांची असताना लिहिलेल्या कवितेतला हा तुकडा आज वाचते तेव्हा वाटतं काळोखभरल्या पानांनी कातर होऊन बाहेर पडलेल्या माझा हा आत्मशोधाचा प्रवास तेव्हापासूनच सुरू झाला असावा.

कसली अस्वस्थता होती ती. जी काळाच्या त्या रेषेवर सुरू झाली आणि आजही घेरून आहे. अनेकदा बाहेरून सारंच आलबेल आहे असं वाटत असतं आपल्याला, पण तसं ते नसतं हे हळूहळू लक्षात यायला लागतं आपल्या. माझं वाचन खूप झाल्यामुळे असेल किंवा अनेक लेखक कवी, विचारवंतांचा सहवास लाभल्यामुळे असेल पण मला खूप लवकर प्रश्न पडायला लागले असावेत. जगण्याविषयी आणि माझ्या या व्यवस्थेतल्या स्थानाविषयीही. त्यावेळी कळत नव्हतं हे व्यवस्थेतलं स्थान काय असतं ते? पण हातात बांगड्या घालायच्याच, कपाळाला कुंकू लावायचंच असं माझ्या काकांनी मला सांगितल्यावर मी त्या घालायच्या नाकारल्या. अनेक वर्षं पुरुषांसारखं कडं घालत होते हातात. कोणीतरी सांगितलं पुरुष उजव्या हातात आणि बायका डाव्या हातात घड्याळ घालतात. मग मुद्दाम उजव्या हातात घालायला लागले. पुढं कुठंतरी ऐकलं मोठं बटबटीत कुंकू नाही लावायचं चांगल्या घरातल्या बायकांनी. मग मुद्दामहून सगळ्यात मोठी टिकली कपाळावर चिटकवायला लागले आणि लिहूनही टाकलं

*'कुंकू बरं दिसतं म्हणून रेखावं,*
*त्यात फार काही नसतं,*
*फक्त त्यानं दिलेल्या ओल्या जखमांचं*
*कोळलेलं कोरडेपण असतं.'*

माझ्या कथांना आणि कवितेलाही उपरोधाची धार सुरुवातीपासून होती. 'निरन्वय'मधील अनेक कवितांत ती जागोजागी दिसते.

*पहाटे पहाटे साखरझोपेत जेव्हा मी*
*द्रौपदीची वस्त्रं फेडणारा दुःशासन*
*पाहिला तेव्हा*
*संध्याकाळी पाहायला येणारा*
*मुलगा आठवला.*
*आणि मग रेडिओ विव्हळला-*
*'उघड्या पुन्हा जहाल्या जखमा उरातल्या.'*

(संदर्भहीन- निरन्वय)

त्या काळात वाचलेल्या पाश्चात्त्य तशाच भारतीय कथा, महाकाव्य, त्यातली पात्रं, घटना आणि त्यात आलेली मिथकं मी तपासून पाहायला लागले आणि या साऱ्यात बाईच्या वाट्याला आलेलं दुय्यमत्व जाणवायला लागलं. शब्दांत आक्रमकपणा यायला लागला आणि माझ्या लेखणीला माझ्या नकळत धार येत गेली.

लग्नानंतर तर या व्यवस्थेनं मला दिलेलं दुय्यम स्थान प्रकर्षानं जाणवायला लागलं. आपल्या अंगात असलेलं बंड लग्न नावाची व्यवस्था साफ चिरडून टाकते. विशेषतः बाईच्या बाबतीत. तुमचे विचार समजण्याची शक्ती नसणारी किंवा त्या जगाशी काही संबंध नसलेली माणसं तुमच्या आयुष्यात येतात. लिहिता म्हणजे काय करता नेमकं हे माहीत नसलेली आणि काही वाचायचा त्रासही न घेणारी माणसं आजूबाजूला भेटतात तेव्हा आपल्या या शब्दांचं काय करायचं, हा प्रश्न पडायला लागतो. असा प्रश्न मला वाटतं प्रत्येक लेखक-कवीला पडत असणार. पण बाईला तो जास्त पडत असावा.

परंपरेच्या चौकटीत बांधल्या गेलेल्या, व्रतवैकल्याचा आधार घेणाऱ्या, सारे सणवार साग्रसंगीत करणाऱ्या, चार लोकांत सुनेची भूमिका व्यवस्थित वठविणाऱ्या स्त्रिया माझ्या आजूबाजूला होत्या आणि मीही त्यांच्यासारखंच व्हावं अशी अपेक्षाही करत होत्या. मनानं तशा निर्मळ पण या व्यवस्थेनं परंपरांच्या बेडीत जखडून ठेवलेल्या या स्त्रियांना माझी घुसमट मला सांगता येत नव्हती आणि त्यांना ती कळतच नव्हती. मनमुक्त भिरभिरता येईल, मनसोक्त वाचता येईल, हवं तसं उडता येईल अशा घरातून आलेली चिमणी बंदिस्त झाली घरट्यात. सून, पत्नी, वहिनी, जाऊ, आई अशा विविध भूमिकांमध्ये वावरताना होणारी दमछाक जाणवायला लागली. ती सगळ्याच मुलींना जाणवते, पण हे करावंच लागतं बाईला, रुजवावं लागतं तिला नव्या घरात असं आपली व्यवस्था जन्मापासून कानीकपाळी ओरडत असते मुलीच्या, अगदी आजही. नव्या घरात व्यवस्थित रुजायचं असेल तर छाटाव्या लागतात तरारून येणाऱ्या, पण इतरांना नको वाटणाऱ्या तुमच्या अस्तित्वाच्या फांद्या.

हे सारं माझ्या भोवतालच्या बायका विनातक्रार करत होत्या. या व्यवस्थेचा हा भाग आहे हे त्यांनी मनाच्या पाटीवर आदिम काळापासून गिरवून ठेवलं होतं. आदर्श सून, पत्नी आणि आईविषयीच्या अनेक मिथकांनी गच्च भरलेल्या पाटीवर आपल्या मनातला अलवार पक्षी रेखण्यासाठी जागाच मिळत नाही बाईला. स्वतःच्या हातांनी या पक्ष्याचे पंख मिटून लोटून देते ती मनाच्या तळाला. त्या तळघराची दार बंद करून जगणाऱ्या बाईत माझंही रूपांतर होतं आहे हळूहळू याची जाणीव व्हायला लागली मला आणि माझा आवाज आणखी प्रखर होत गेला. मी माझ्या कवितेतून, कथेतून तो उमटवू लागले. गेली अनेक वर्षं ज्या स्त्रीविषयी मी लिहिते आहे ती एकीकडे या व्यवस्थेनं शोषण केलेली, पुरुष या केंद्राभोवती फिरणारी स्त्री आहेच, पण दुसरीकडे स्वतःला सापडलेली, आत्मशोधाकडे निघालेली, व्यवस्थेला जाब विचारणारी, निर्णय घेण्याची क्षमता बाळगणारी, स्वतःला तपासून पाहणारी आणि स्त्रीच्या लैंगिकतेविषयी मोकळेपणानं बोलणारी स्त्रीही आहे.

स्त्री ही माझ्या लेखनाच्या केंद्राशी आहेच, पण तरी माणूस म्हणून असलेलं माझं जगणंही माझ्यासाठी महत्त्वाचं आहे. एक माणूस म्हणून माझा संघर्ष हा जसा परंपरेशी, या परंपरेतल्या कर्मकांडाशी आहे तसाच तो जात, धर्म, लिंग यावर आधारलेल्या मानवी व्यवहाराशी, संपूर्ण समाजाशी, त्याच्या सत्ताकारणाशीही आहे. जातिव्यवस्था, धर्मव्यवस्था किंवा लिंगव्यवस्था आपल्याला हवी तशी वापरणाऱ्या लोकांची मानसिकता मला अस्वस्थ करत जाते. जगात कुठेही झालेला बलात्कार हा मला माझ्या स्त्रीत्वावर झालेला बलात्कार वाटतो.

*'काय असते जात बाईची*
*आणि कोणता असतो धर्म?*
*बदलतो का वेदनेचा स्तर*
*जात बदलली तर?*
*शरीराला ओरबाडणाऱ्या चेहऱ्यांवर*
*कसलं असतं समाधान*
*बाईला भोगल्याचं की*
*जातीला भोगल्याचं?'* असे प्रश्न मला पडत राहातात.

नितीन आगे, भोतमांगे कुटुंब असो की अखलाखसारखे जात आणि धर्मव्यवस्थेचे बळी असोत, बाबरी मस्जिद पाडल्यावर झालेल्या किंवा पुढे गोध्रामध्ये उसळलेल्या दंगली असोत, २६-११चा हल्ला असो, तालिबान्यांचं कसाबकृत्य असो की धर्माच्या नावावर उसळलेला उन्माद असो, परंपरांच्या विरोधात लिहिलं म्हणून पेरूमल मुरुगनसारख्या लेखकाला करावी लागलेली त्याच्यातल्या लेखकाची हत्या असो की गेल्या तीन-चार वर्षांत झालेल्या दाभोळकर, पानसरे, कलबुर्गीसारख्या लोकांच्या हत्या किंवा रोहित वेमुल्लाची आत्महत्या असो या साऱ्या गोष्टी मला अस्वस्थ करतात. आणि मग, 'मला कळत नाही मी कोणत्या युगात आले आहे नेमकी.' अशा वेळी माझ्या मनात शब्द उमटतात,

*'गळ्यातून उमटू नये एकही शब्द म्हणून*
*आवळून फास*
*लटकावताहेत मला*
*आत्महत्येच्या झाडावर.*
*या दिशाहीन दशकात*
*ओतलं जातं आहे*
*माझ्या घशात*
*राष्ट्रवादाचं ग्राईपवॉटर*
*मेंदूच्या आत भरताहेत*
*भुसा हिंसेचा*
*विकासाच्या*
*बेडक्या फुगवून*
*आखाड्यात उतरलेले लोक*
*कापताहेत माझी*
*लिहिती बोटं*
*आणि कोणत्याही*
*फुटपाथवर*
*रेखाटताहेत माझं*
*थारोळ्यात पडलेलं चित्र.'*

कवी किंवा लेखक बाहेरच्या जगात वावरताना केवळ कवी नसतो तो अनेकांसारखाच एक असतो. एकाचवेळी अनेक भूमिका वठवत असतो. फक्त त्याचं मन काहीतरी सतत टिपत असतं, शोधत असतं. हा शोध घेताना मला अगदी सुरुवातीपासून जाणवली ती जगण्यातली निरर्थकता, आपलं हजारो तुकड्यांत झालेलं विभाजन, या शहरालाच नाही जगातील प्रत्येकाला लागलेली भौतिक विकासाची चटक, आपलं बदललेले राजकीय वास्तव आणि गुंतागुंतीचे होत गेलेले सामाजिक संदर्भ. हे सगळं अस्वस्थ करत असतं मला. मग ही अस्वस्थता कधीतरी अचानक शब्दांतून उतरते, त्याची कथा होते तर कधी कविता. 'निरर्थकाचे पक्षी' किंवा 'मी माझ्या थारोळ्यात' असे कवितासंग्रह असोत की 'पावसात सूर्य शोधणारी माणसं' किंवा 'अस्वस्थ मी अशांत मी' हे कथासंग्रह असोत माझ्या आत चालू असलेली उलथापालथ माझ्या संग्रहांच्या नावातूनही व्यक्त होत राहते.

'श्रीकांत विनायकची गोष्ट' ही अशीच अस्वस्थतेतून लिहिली गेलेली कथा आहे. कुठंतरी भेटलेली माणसं अचानक माझ्या कथेचा भाग होऊन जातात. मग ते श्रीकांत विनायक असोत, 'सत्तेची काठी' मधला वसंता असो, की ती 'रत्नप्रभा जाधव वर्तमानपत्रातील बातमी होते तेव्हा' या कथेतील रत्नप्रभा जाधव असो, 'ओल हरवलेली माती' या कथेतली फातिमाबी असो की 'महिषासुरमर्दिनी'मधली सती असो. माझ्या आजूबाजूला किती वेगवेगळ्या प्रकारची माणसं राहात असतात. त्यांच्या स्वभावाचे विलक्षण कंगोरे पाहून थक्क व्हायला होतं. कोणत्याही कथेतलं पात्र साकार होण्याआधी ते कुठंतरी, कोणात तरी किंवा एकाच वेळी अनेक माणसात भेटलेलं असतंच आपल्याला. कधी कधी तर कोणाचं एखादं वाक्यही तुमच्या कथेचं कळीचं वाक्य होऊन जातं. मला आठवतं मी 'जस्ट बिट्विन अस' या पुस्तकातील भारतीय लेखिकांच्या मुलाखती वाचत होते. त्यात एक कवयित्री म्हणाली होती की तिचं लग्न केवळ सत्तर दिवस टिकलं होतं. न टिकण्याची कारणं अनेक होती. मुख्य कारण होतं तिचं सर्जनशील मन समजू न शकणारा नवरा. पहाटेची वेळ ही तिच्या वाचनाची ठरलेली वेळ होती आणि लग्न झाल्यावर मात्र पहाटे पहाटे मार्केटमध्ये जाऊन तिला मासे आणावे लागत आणि ते साफ करून सगळ्या घरासाठी शिजवावे, तळावे लागत. हे करत आयुष्य काढणं शक्य नव्हतं तिला आणि तेही कवितेची किंमत मोजून. हे सारं मला कित्येक दिवस अस्वस्थ करत होतं. आणि त्या वाक्याभोवती फिरणाऱ्या माझ्या मनात अचानक पहिली ओळ आली. 'पाच महिने तेवीस दिवसांचा सहवास...सहवास म्हणायचा की कारावास हे मात्र ठरवायला लागेल. नाहीतर कोणत्या कारणासाठी अशी सहाव्या महिन्याच्या चोविसाव्या दिवशी बॅग उचलून बाहेर पडले मी... अनंत दीनानाथ बावीस्कर या मुखदुर्बळ माणसानं लग्न कशासाठी केलं माझ्यासारख्या मुलीशी हा राहून राहून प्रश्न पडतो मला. अर्थात वंदना लक्ष्मण कुडाळकर या आपला एकटीचा कोपरा शोधू पाहाणाऱ्या बाईनेही लग्न का केलं असा प्रश्न अनंत बावीस्करलाही पडला होताच.' ही कथा 'अस्वस्थ मी अशांत मी' या नव्या संग्रहात 'पाच महिने तेवीस दिवस' या शीर्षकानं लवकरच येते आहे.

कितीतरी प्रसंग, कितीतरी माणसं ओळखीची, अनोळखी, कधी एखाद्या चित्रपटातलं अस्वस्थ करणारं पात्र तर कधी कुठं प्लॅटफॉर्मवर भेटलेली एखादी स्त्री किंवा पुरुष, जी माझ्या कथांतली पात्र होऊन जातात. 'ओल हरवलेली माती' या कथेतली फातिमाबी मला अशीच भेटली होती. दहिसर ते अंधेरी प्रवासात आणि रुतून बसली कायमची. माझ्या कथेचं पात्र झाली तेव्हाच पाठ सोडली तिनं माझी.

माझी कथा असो की कविता माझं लेखन हे माझ्या काळाचं आहे. आज जगण्यात खोलवर दडलेली, सतत सलणारी आणि विषण्ण करणारी वेदना ते अधोरेखित करतं आहे. ही वेदना कदाचित भौतिक विकासाच्या मागे लागलेल्या माणसाच्या नजरेला दिसत नसेलही. पण मला जाणवत राहाते. अर्थात माझा माणसातल्या माणूसपणावरही तेवढाच विश्वास आहे. कारण मला वाटतं,

*माणसं वाईट नसतात तशी*
*त्यांना माहीत असतो*
*दया, करुणा, सहवेदना*
*या शब्दांचा नेमका अर्थ*
*पण तरीही दहशतीच्या उन्हात*
*शोधताना सावली स्वतःपुरती सुरक्षित*
*माणसं होत जातात मनानं घट्ट*
*बाहेरच्या वादळांना थोपवून धरतात*
*शूर वीराप्रमाणं*
*आपल्या जगण्याभोवती रचतात*
*भक्कम तटबंदी*
*आणि साजरं करतात आयुष्य हौशीनं*
*माणसं खरंच वाईट नसतात तशी,*
*फक्त जगण्याचा प्रयत्न करतात आटोकाट*
*मरेपर्यंत.*

या अशा माणसांचं जगणं जर जाणून घ्यायचं असेल तर मला या समाजातलं एक होऊन राहावं लागतं. पण ज्या समाजात मी राहात असते तो समाज काही समविचारी लोकांनी बनलेला नसतो आणि तशी अपेक्षा करणंही चुकीचं आहे. अनेकदा अशा समाजाला समजून घेण्यात आयुष्य जातं आपलं. पण लेखकाला ते करावं लागतं.

आज लेखकाला त्याच्याच काळात लिहिणारे लेखक समजून घेणंही कठीण झालं आहे. अशा काळात जगताना माणसाच्या मनातलं भय आणि त्यासोबतच त्याच्या मनातल्या महत्त्वाकांक्षा, राजकीय लालसाही समजून घ्याव्या लागतात. हा सारा प्रयत्न मी करते आहे. माझ्याबरोबर इतरांच्या जगण्याच्या मागची सृष्टीही पाहण्याचा प्रयत्न करतेय. पाहू कितपत जमतंय ते. शेवटी एवढंच म्हणेन

*हिरवी ओल जपून ठेवली*
*काळजात कायमची*
*तर सोपं होतंच आकांताला छेद देत जगणं*
*बारोमास उन्हाळ्यातही.*

■ neerajan90@yahoo.co.in



Deshpande's
Taste for Life
Premium Atta
टेस्ट फॉर लाईफ चे चकली भाजणी आणि बेसन लाडू रेडी मिक्स
टेस्ट फॉर लाईफ चे रेडी मिक्स आणा आणि झटपट, खुसखुशीत चकल्या व स्वादिष्ट बेसन लाडू बनवा.



५०० ग्रॅ. मध्ये ४० ते ४५ चकल्या
२५० ग्रॅ. मध्ये साधारण १२ लाडू होतात
कस्टमर केअर : 9619600080 / 9819819892
email : sales.tasteforlife@gmail.com
ACE GRAPHICS

# १०० वर्षांपूर्वीची ज्ञानमार्गी

(पान १ वरून) त्यांना समुपदेशन देणं ही कामगिरी वीस वर्षं केली. कुठेही सामाजिक असमानता दिसली की त्या तिथे जाऊन काम करीत. त्यांची मानस कन्या सखू हिने सांगितलं म्हणून रमाबाईंनी माधवरावांच्या सहवासातल्या आठवणी लिहून काढल्या. 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे पुस्तक १९१० मध्ये प्रकाशित झालं. न्या. रानडे याची 'धर्मपर व्याख्याने' हे पुस्तक रमाबाईंनी वैद्य यांच्या मदतीने प्रकाशित केलं.

मार्च १९२२ पासून रमाबाईंना हृदयविकाराचा त्रास सुरू झाला. पुन्हा दोन वर्षांनी १९२४ मध्ये रमाबाईंना कर्करोगाचा प्रादुर्भाव झाला. त्या आजारातच २६ एप्रिल १९२४ रोजी दुपारी त्या अज्ञाताच्या प्रवासाला गेल्या. त्यांच्या अंत्ययात्रेत हजारोंच्या वर स्त्री-पुरुष होते. स्त्रिया स्मशानात जात नाहीत तरीही अनेक स्त्रिया अंत्ययात्रेला होत्या. स्मशानात रँगलर परांजपे व बनुताई भट यांची भाषणं झाली. त्यांच्या भावाने त्यांना अग्नी दिला. इच्छापत्र करताना रमाबाईंनी आपली स्वतःची मिळकत 'सेवासदना'ला दिली.

न्या. रानडे यांचे विचार आजही परिप्लुत आहेत आणि रमाबाईंनी उभं केलेलं 'सेवासदन'चं कार्य अजूनही या २१ व्या शतकात चालू आहे. समाजकार्य आणि 'सेवासदन' यांच्याशी त्यांचं प्रेमाचं व आपलेपणाचं नातं जुळलं होतं आणि मनात, विचारात माधवराव वसलेले होते.

एक अशिक्षित चिमुरडी माधवरावांच्या आयुष्यात येते आणि नुसती सुशिक्षितच नव्हे तर ज्ञानकर्मी होऊन नवऱ्याचं जीवितकार्य पुढे नेऊन ठेवते. केवढं हे आमूलाग्र परिवर्तन! उच्चकोटीच्या मनुष्यपदाला रमाबाई पोचल्या. त्या शिक्षणाने, ज्ञानाने आणि नवऱ्याच्या अभंग प्रेमाच्या बळावर.

*संदर्भ - १) आमच्या आयुष्यातील काही आठवणी - रमाबाई रानडे*
*२) रमाबाई महादेवराव रानडे - व्यक्तित्व आणि कर्तृत्व - ले. विलास खोले*

■

(पान ३ वरून) शासकीय वाहन का नेले नाही, रेकॉर्डवर झडतीसाठी गेल्याचा कोणताही पुरावा का दिसत नाही वगैरे प्रश्न सर्वोच्च न्यायालयात उपस्थित करण्यात आले. अशा सर्व झाडाझडतीमधून तो अधिकारी दोषी असल्याचे सिद्ध झाले. सर्वोच्च न्यायालयाने त्याला योग्य ती शिक्षा दिली. घटना साधीच, परंतु यातून एक महत्त्वाचे न्यायतत्त्व प्रस्थापित व्हायला मदत झाली ते म्हणजे स्त्रीच्या चारित्र्याचा तिच्यावर होणाऱ्या अन्यायाशी संबंध जोडण्याची गरज नाही. या प्रकरणामध्ये संबंधित महिला एका व्यापाऱ्याशी संबंध ठेवते आहे हे न्यायालयासमोर आले होते, परंतु तिच्या अशा वर्तणुकीमुळे ती सर्वांसाठी उपलब्ध आहे, असे समजण्याची गरज नाही. न्या. के. जे. शेट्टी व न्या. ए. अहेमदी यांनी अगदी स्पष्ट शब्दांत आपले मत मांडले की, 'अ वुमन विथ ईझी व्हर्च्यू ईज एन्टायटल्ड टू प्रायव्हसी'. एखादी 'चारित्र्यहीन' मानली गेलेली स्त्री असेल तरी तिलाही खासगीपणा जपण्याचा हक्क आहे. कोणालाही वाटेल तेव्हा तिच्याशी मनमानी करण्याचा हक्क नाही. शिवाय ती अशी स्त्री आहे म्हणून तिचा पुरावा मोडीत काढला जाऊ शकत नाही.

कामाच्या ठिकाणी आपला हुद्दा, गणवेश वा इतर

# झीरो टॉलरन्स

कोणत्याही प्रकारच्या सत्तेच्या आड लपून स्त्री कर्मचाऱ्यांचा किंवा इतर काही निमित्ताने संपर्कात येणाऱ्या स्त्रियांचा गैरफायदा घेता येणार नाही, असा महत्त्वाचा संदेश या प्रकरणातून मिळतो आहे.

सहकार्य, मैत्री, प्रेम, मालकीची भावना, स्त्रीदाक्षिण्य आणि स्त्री आहे म्हणून तिला कमकुवत समजून तिच्यावर हक्क गाजवणे या वेगवेगळ्या छटा आहेत. कामाच्या ठिकाणी स्त्री-स्त्री, पुरुष-पुरुष, स्त्री-पुरुष अशा सहकाऱ्यांमध्ये या छटा दिसणे स्वाभाविक आहे, परंतु यातील कोणत्या छटा स्वाभाविक आहेत, कोणत्या प्रकारच्या संवादाला, देवाण-घेवाणीला प्रोत्साहन द्यायचे, कोणत्या प्रकारची वागणूक वेळीच थांबवायची हे त्या कर्मचारी समूहावर आणि तेथील वरिष्ठ अधिकारी वर्गावर खूप प्रमाणात अवलंबून आहे.

कायदे आणि न्याययंत्रणा ही लिंगभेदापलीकडे गेली पाहिजे ही मागणी काही प्रमाणात रास्तच आहे. रहदारीचे नियम, वाहनचालकाला परवाना मिळण्याचे नियम, पॅनकार्ड, आधारकार्ड मिळण्याचे नियम हे सर्वांना समान असणे हे बरोबरच आहे, परंतु जोपर्यंत स्त्रीपुरुष समानता ही श्रम, प्रजनन, संपत्ती आणि संचार या सर्वच बाबतीत आपल्या अंगवळणी पडत नाही, तोपर्यंत कायदे जेंडर न्यूट्रल करून चालणार नाहीत. विशेषतः लैंगिक छळाबाबत अधिक संवेदनशीलता बाळगणे अत्यावश्यक आहे.

कायद्यांचा गैरवापर होतही असेल. सर्वच कायद्यांचा गैरवापर होताना दिसतो. स्त्रीही सर्व गुण-दोषांसकट एक स्वतंत्र व्यक्ती आहे हे लक्षात ठेवून आपण लिंगभेदविरहित भूमिका घेऊन कायद्याचा गैरवापर कोणीच करायचा नाही अशी भूमिका घेत नाही. आजकाल स्त्रिया कायद्याचा गैरवापर करू लागल्यात अशा हमखास टाळ्या मिळवणाऱ्या वाक्याच्या आहारी जातो. यातूनच आपली स्त्रीविरोधी मानसिकता दिसते.

कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २०१३ मध्ये मिळाला. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक ठिकाणी स्वतंत्र कार्यपद्धती प्रस्थापित करणे, तक्रार निवारण यंत्रणा उभी करणे, अंतर्गत व स्थानिक तक्रार निवारण समित्यांनी कायद्याच्या मदतीने न्याय मिळवून देणे हे यथावकाश सुरूच राहील. कायदा जसजसा वापरला जाईल, तसतशी त्यातील मर्यादा आणि पळवाटाही समोर येतील, तो अजून बळकट करता येईल, परंतु त्याबरोबरीने समाजाची स्त्रीविरोधी मानसिकता बदलण्यासाठी अजून प्रयत्न करू या.

■ marchana05@gmail.com

टॉन्सिल्सच्या विकारांवर गुणकारी
ऑन टॉन्सिल®
होमिओपाथिक गोळ्या
होमिओ लॅबोरेटरीज्, वारजे-पुणे
In Convenient Self dispensing pack
वितरक : बी.आर.एन्टरप्रायझेस-फोन: 022-26776315